# सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ

गणेशखिंड, पुणे - ४११००७

# Savitribai Phule Pune University

Ganeshkhind, Pune - 411007

सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ

दूरध्वनी क्रमांक: ०२०-२५६२१२०५
Telephone No.: 020-25621205
ईमेल/ Email:pgadmis@pun.unipune.ac.in

शैक्षणिक प्रवेश विभाग
P.G. Admission Section
संकेतस्थळ/Website: www.unipune.ac.in


## परिपत्रक क्र. ३१८ /२०२४

**विषय : संशोधन केंद्र, संशोधन मार्गदर्शक, शीर्षक बदल करणे, नवीन सह-मार्गदर्शक घेणे किंवा रद्द करणे, पुन:नोंदणी, मुदतवाढ, प्रवेश रद्द करणे, इ. सुविधा ऑनलाईन पध्दतीने करणेबाबत ..**

मा. प्राचार्य/संचालक, सर्व संलग्नित संशोधन केंद्रे यांना कळविण्यात येते की, पीएच्.डी. प्रवेशित विद्यार्थी संशोधन केंद्र बदल, संशोधन मार्गदर्शक बदल, शीर्षक बदल, नवीन सह-मार्गदर्शक घेणे किंवा रद्द करणे, पुन:नोंदणी, मुदतवाढ, प्रवेश रद्द करणे, इ. प्रकारचे अर्ज विद्यापीठाकडे करत असतात. सदर अर्ज करताना विद्यार्थ्यांना प्रत्यक्षरित्या संशोधन मार्गदर्शकांची व संशोधन केंद्रप्रमुखांच्या स्वाक्षरीसह संबंधित कागदपत्रे या कार्यालयाकडे जमा केल्यानंतर प्राप्त अर्जावर या कार्यालयाकडून कार्यवाही केली जात होती. ही प्रक्रिया पूर्ण करण्यास कालापव्यय होत असल्याने तसेच या प्रक्रियेत संबंधितांना प्रत्यक्षरित्या विद्यापीठात यावे लागत असल्याने त्यांच्या वेळचासुद्धा अपव्यय होतो.

त्याअनुषंगाने वरील प्रक्रिया ऑनलाईन पध्दतीने विहीत करण्यात आलेली आहे. त्यानुसार खाली दिलेल्या टप्प्यानुसार कार्यवाही करावी. याबाबत विद्यार्थ्यांना वेगवेगळे अर्ज करण्यापासून ते मान्यता देण्यापर्यंतचा तक्ता सोबत जोडला आहे. विद्यार्थ्यांना वरीलपैकी अर्ज करताना पीएच्.डी. ट्रॅकींग सिस्टीमध्ये सर्व कागदपत्रे अपलोड करणे आवश्यक आहे.

1. विद्यार्थ्याने पीएच्.डी. ट्रॅकींग सिस्टीमधून त्याच्या लॉगीनव्दारे अर्ज करायचा आहे.
2. त्यानंतर अर्ज संबंधित संशोधन मार्गदर्शकांच्या लॉगीनमध्ये मान्यतेकरिता उपलब्ध होईल.
3. संशोधन मार्गदर्शकाने मान्यता दिल्यानंतर सदर अर्ज संबंधित संशोधन केंद्राच्या लॉगीनमध्ये मान्यतेकरिता उपलब्ध होईल.
4. संशोधन केंद्राने मान्यता दिल्यानंतर वेगवेळ्या अर्जांचा विचार होऊन शैक्षणिक प्रवेश विभागाकडून पुढील कार्यवाही करण्यात येईल.

सदर संगणक प्रणाली दि. ०१ जानेवारी, २०२५ पासून सुरू करण्यात येत आहे. **दि. ०१ जानेवारी, २०२५ नंतर फक्त ऑनलाईन पध्दतीनेच अर्ज करावेत. अर्जाची प्रत शैक्षणिक प्रवेश विभागात जमा करू नये.**

वरीलप्रमाणे वेगवेगळे अर्ज करण्यापासून ते मान्यता देण्यासाठीची प्रक्रिया सुलभ होण्यासाठी याबाबतचे User Manual विद्यार्थी, संशोधन मार्गदर्शक, संशोधन केंद्र यांच्या Login मध्ये उपलब्ध करून देण्यात आलेले आहेत.

गणेशखिंड, पुणे ४११००७ )
संदर्भ: शै.प्रवेश/ ४९६४ )
दिनांक: ३१/१२/२०२४ )

(डॉ. मुंजाजी रासवे)
उपकुलसचिव

D:\General Circulars\Change Request Circular.docx

**प्रत माहिती व योग्य त्या कार्यवाहीसाठी :-**

1. मा. कुलगुरू, प्रस्तुत विद्यापीठ.
2. मा. प्र-कुलगुरू, प्रस्तुत विद्यापीठ.
3. मा. अधिष्ठाता, सर्व विद्याशाखा, प्रस्तुत विद्यापीठ.
4. मा. अध्यक्ष, सर्व नियमित व तदर्थ अभ्यास मंडळे, प्रस्तुत विद्यापीठ.
5. मा. विभागप्रमुख, सर्व शैक्षणिक विभाग, प्रस्तुत विद्यापीठ.
6. मा. प्राचार्य/संचालक, विद्यापीठाशी संलग्नित सर्व संशोधन केंद्रे/संस्था.
7. सर्व मान्यताप्राप्त संशोधन मार्गदर्शक, प्रस्तुत विद्यापीठ.

**संशोधन केंद्र, संशोधन मार्गदर्शक, शीर्षक बदल करणे, नवीन सह-मार्गदर्शक घेणे किंवा रद्द करणे, पुन:नोंदणी, मुदतवाढ, प्रवेश रद्द करणे, इ. अर्ज करणे व त्यास आवश्यक मान्यतांचा तक्ता.**

| Create Request, Verification & Approval. | Supervisor Change | Centre Change | Title Change | Cancel Admission | Co-Supervisor Appoint | Co-Supervisor Cancellation | Re-registration | Extension |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| **Student** create request | Yes | Yes | Yes | Yes | Yes | Yes | Yes | Yes |
| **Research Supervisor** Verify & Approval | Yes | Yes | Yes | Yes | Yes | Yes | Yes | Yes |
| **Co-Research Supervisor** Verify & Approval (if applicable) | Yes | Yes | Yes | Yes | Yes | Yes | Yes | Yes |
| **Research Centre** Verify & Approval | Yes | Yes | Yes | Yes | Yes | Yes | Yes | Yes |
| **Table Person** Verify & Approval | Yes | Yes | Yes | Yes | Yes | Yes | Yes | Yes |
| **Asst. Registrar** Verify & Approval | Yes | Yes | Yes | Yes | Yes | Yes | Yes | Yes |
| **Dy. Registrar** Verify & Approval | Yes | Yes | Yes | Yes | Yes | Yes | Yes | Yes |
| **Hon. BOS Chairman, Concern subject** Verify & Approval | No | No | Yes | No | No | No | No | No |
| **Hon. DEAN, Concern faculty** Verify & Approval | Yes | Yes | Yes | Yes | Yes | Yes | Yes | Yes |
| **Hon. Pro-VC** Verify & Approval | No | No | Yes | Yes | No | No | No | Yes |
| **Hon. VC** Verify & Approval | No | No | No | No | No | No | No | Yes |

**Research Supervisor Change:** Request should be verified & approved by old & new Research Supervisors.

**Research Centre Change :** Request should be verified & approved by old & new Research Centres.

Deputy Registrar
(Admissions)

D:\General Circulars\Change Request Circular.docx